# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी - ५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

(विद्या विभाग)

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : academic.section@unigug.ac.in / academic.gug@gmail.com

जा.क्र./गों.वि./विद्या/१०१६/२०२५ दिनांक:- 08/07/2025

# परीपत्रक

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभुत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्यावत करणेबाबत.

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक एनजीसी/Intake Approval/२०२५/५४६/ दिनांक ३० जुन २०२५

२. संचालनालयाचे परीपत्रक क्रं. २/एनजीसी/Intake Approval/२०२५/४१८ दिनांक २३/०५/२०२५

३. संचालनालयाचे परीपत्रक क्रं. २/एनजीसी/Intake Approval/२०२५/५०९ दिनांक १७/०६/२०२५

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये तथा संबंधितांना कळविण्यात येते कि,शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभुत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्यावत करणेबाबत संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांच्याकडुन पत्र प्राप्त झालेले असुन सदर पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रिभुत प्रवेश प्रकियेकरीता सहभागी असणाऱ्या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहीती अचुक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष मुंबई यांचे मार्फत पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असल्याने संस्थेबाबत पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संबंधित शिखर परीषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडुन संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती, तसेच त्यासोबत संस्थेचे सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या http/ugpg२५.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत करुन दिनांक १५ जुन २०२५ व तद्नंतर दिनांक ०१ जुलै २०२५ रोजी सायंक ाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भ क्रमांक ०२ च्या परीपत्रकान्वये कळविण्यात आले होते. मात्र अद्यापही काही संस्थांनी त्याची माहिती अद्ययावत केलेली नाही तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रवेश प्रक्रियेकरीता विद्यार्थ्यांना नोंदणी करण्याकरीता मुदतवाढ दिलेली आहे. प्रवेश प्रक्रियेकरीता दिलेल्या मुदतवाढीस अनुसरुन सर्व संस्थांनी दिनांक १०.०७.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे. ज्या संस्था अशी माहिती अद्यायावत करणार नाही अशा संस्थांचा समावेश केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. याबाबत सदर संचालकांनी कळविलेले आहे. करीता सदर बाबत करीता सदर बाबत महाविद्यालयास्तरावरुन तात्काळ कार्यवाही घेण्यात यावी हि विनंती.

सहपत्र :- संलग्नित पत्र

(डॉ. अनिल के. हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:-

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांना उचित कार्यवाहीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५, ४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

महत्वाचे परिपत्रक/कालमर्यादित

क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२५/ ५३६

दिनांक : 30 JUN 2025

प्रति,

प्राचार्य / संचालक

सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : १)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/Intake Approval/२०२५/४१८, दि.२३.५.२०२५
२)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/Intake Approval/२०२५/५०९, दि.१७.६.२०२५

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असल्याने संस्थेबाबत पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडून संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती, तसेच त्यासोबत संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या https://ugpg25.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत करून दि. १५ जुन २०२५ व तद्नंतर दि.०१ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. मात्र अद्यापही काही संस्थांनी त्यांची माहिती अद्ययावत केलेली नाही. तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रवेश प्रक्रियेकरीता विद्यार्थ्यांना नोंदणी करण्याकरीता मुदतवाढ दिलेली आहे. प्रवेश प्रक्रियेकरीता दिलेल्या मुदतवाढीस अनुसरून सर्व संस्थांनी दिनांक १०.०७.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे.

ज्या संस्था अशी माहिती अद्ययावत करणार नाहीत, अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीसाठी सादर
२. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर-
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि.११.०७.२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.
४. अध्यक्ष / सचिव, सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
५. कार्यासन अधिकारी, का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई
यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.